NOTICE is hereby given that the **78th Annual General Meeting ('AGM' or 'Meeting') of the Members of Nelco Limited ('the Company') will be held on Tuesday, 22nd June 2021 at 4.30 p.m. (IST) via two-way Video Conferencing ('VC') facility / Other Audio Visual Means ('OAVM') ONLY,** to transact the businesses set out in the Notice of the AGM. In compliance with the applicable provisions of the Companies Act, 2013 and the rules made thereunder, read with General Circular No. 20/2020 dated May 5, 2020 and General Circular No.02/2021 dated January 13, 2021, General Circular No.14/2020 dated April 8, 2020, General Circular No.17/2020 dated April 13, 2020, General Circular No. 20/2020 dated May 5, 2020, General Circular No. 33/2020 dated September 28, 2020, General Circular No. 39/2020 dated December 31, 2020 and General Circular No.02/2021 dated January 13, 2021 issued by the Ministry of Corporate Affairs ('MCA Circulars') and Circular No. SEBI/HO/CFD/CMD1/CIR/P/2020/79 dated May 12, 2020 and SEBI/HO/CFD/CMD2/CIR/P/2021/11 dated January 15, 2021 issued by the Securities and Exchange Board of India ('SEBI Circulars'), the Company has sent the Notice of the 78th AGM along with the link to the Annual Report for FY 2020-21 on Monday, 24th May 2021 through electronic mode only, to those Members whose e-mail addresses are registered with the Company or Registrar & Transfer Agent, TSR Darashaw Consultants Private Limited ('TSR') and Depositories. **The requirement of sending physical copies of the Notice of the AGM has been dispensed with vide MCA Circulars and the SEBI Circulars.**

The Annual Report 2020-21 of the Company, inter alia, containing the Notice and the Explanatory Statement of the 78th AGM is available on the website of the Company at www.nelco.in and on the websites of the Stock Exchanges viz. www.bseindia.com and www.nseindia.com. A copy of the same is also available on the website of National Securities Depository Limited ('NSDL') at www.evoting.nsdl.com.

Remote e-Voting:

In compliance with Section 108 of the Companies Act, 2013 ('the Act') read with Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014, as amended from time to time, Secretarial Standards - 2 issued by the Institute of Company Secretaries of India on General Meetings and Regulation 44 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, the Company is providing to its Members the facility of remote e-Voting before the AGM and during the AGM in respect of the businesses to be transacted at the AGM and for this purpose, the Company has appointed NSDL for facilitating voting through electronic means.

The detailed instructions for remote e-Voting are given in the Notice of the AGM. Members are requested to note the following:

a. The remote e-Voting facility would be available during the following period:

Commencement of remote e-Voting	**From 9.00 a.m. (IST) on Saturday, 19th June 2021**
End of remote e-Voting	**Upto 5.00 p.m. (IST) on Monday, 21st June 2021**

The remote e-Voting module shall be disabled by NSDL for voting thereafter and Members will not be allowed to vote electronically beyond the said date and time;

b. The voting rights of the Members shall be in proportion to their share of the paid-up equity share capital of the Company as on Tuesday, 15th June 2021 ('Cut-Off Date'). The facility of remote e-Voting system shall also be made available during the Meeting and the Members attending the Meeting, who have not already cast their vote by remote e-Voting shall be able to exercise their right during the Meeting. A person whose name is recorded in the Register of Members / Register of Beneficial Owners as on the Cut-Off Date only shall be entitled to avail the facility of remote e-Voting before / during the AGM;

c. Any person holding shares in physical form and non-individual shareholders, who acquires shares of the Company and becomes a Member of the Company after the despatch of the Notice and holds shares as on the Cut-Off Date, may obtain the login-id and password for e-Voting by sending a request at evoting@nsdl.co.in or may contact on toll free number 1800 1020 990 and 1800 22 44 30, as provided by NSDL. A person who is not a Member as on the Cut-Off Date should treat the Notice of the AGM for information purposes only. However, If he/she is already registered with NSDL for remote e-Voting then he/she can use his/her existing User ID and password for casting the votes.

d. Members who have cast their vote on resolution(s) by remote e-Voting prior to the AGM will also be eligible to participate at the AGM through VC/OAVM but shall not be entitled to cast their vote on such resolution(s) again.

Registration of e-mail addresses:

Members who have not yet registered their e-mail addresses are requested to follow the process mentioned below, before 5:00 p.m. (IST) on Monday, 7th June 2021, for registering their e-mail addresses to receive the Notice of the AGM and the Annual Report 2020-21 electronically and to receive login-id and password for remote e-Voting:

a. Visit the link https://tcpl.linkintime.co.in/EmailReg/Email_Register.html
b. Select the Name of the Company from dropdown
c. Enter the Folio No./DP ID, Client ID, Shareholder Name, PAN details, Mobile no. and E-mail id. Shareholders holding shares in physical form are required to additionally enter one of their share certificate numbers.
d. System will send OTP on mobile no. and email id.
e. Enter OTP received on mobile no. and email id.
f. The system will then confirm the e-mail address for the limited purpose of service of Notice of AGM and Annual Report 2020-21.

The above system also provides a facility to the Members holding shares in physical form to upload a self-attested copy of their PAN Card, if the same is not updated in accordance with the requirements prescribed by SEBI.

For permanent registration of their e-mail address, Members holding shares in demat form are requested to update the same with their Depository Participant ('DP') and to TSR for those Members holding shares in physical form.

Updation of bank account details:

Members who have not updated their bank account details for receiving the dividends directly in their bank accounts through Electronic Clearing Service or any other means may follow the below instructions:

Physical Holding	Send a request letter along with the following documents to the Registrar and Transfer Agent of the Company, TSR Darashaw Consultants Private Limited, so that it reaches them latest by Wednesday, 2nd June 2021: a) a signed request letter mentioning your name, folio number, complete address and following details relating to bank account in which the dividend is to be received: i) Name and Branch of Bank and Bank Account type; ii) Bank Account Number & Type allotted by your bank after implementation of Core Banking Solutions; iii) 11 digit IFSC Code. b) self-attested copy of cancelled cheque bearing the name of the Member or first holder, in case shares are held jointly; c) self-attested copy of the PAN Card; and d) self-attested copy of any document (such as Aadhaar Card, Driving License, Election Identity Card, Passport) in support of the address of the Member as registered with the Company.
Demat Holding	Members holding shares in demat form are requested to update their Electronic Bank Mandate with their respective Dps.

In case of any queries / grievances connected with remote e-Voting, you may refer to the Frequently Asked Questions and e-Voting user manual for Members available at the 'Downloads' Section of www.evoting.nsdl.com or call on the toll-free number: 1800 1020 990 and 1800 22 44 30 or send a request to Mr. Sagar Ghosalkar at evoting@nsdl.co.in.

Helpdesk for Individual Shareholders holding securities in demat mode for any technical issues related to login through Depository i.e. NSDL and CDSL.

Login type	Helpdesk details
Individual Shareholders holding securities in demat mode with NSDL	Members facing any technical issue in login can contact NSDL helpdesk by sending a request at evoting@nsdl.co.in or call at toll free no.: 1800 1020 990 and 1800 22 44 30
Individual Shareholders holding securities in demat mode with CDSL	Members facing any technical issue in login can contact CDSL helpdesk by sending a request at helpdesk.evoting@cdslindia.com or contact at 022-23058738 or 022-23058542-43

Mr. P. N. Parikh (FCS 327) or failing him, Mr. Mitesh Dhabliwala (FCS 8331) of M/s. Parikh and Associates, Company Secretaries has been appointed by the Board of Directors of the Company as Scrutinizer for scrutinizing the remote a-Voting process as well as for voting

अखेर वृक्षछाटणीच्या प्रस्तावाला प्रशासनाची मंजुरी..!!

भाजपच्या पाठपुराव्याला यश

मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी): 'तोक्ते' चक्रीवादळामुळे मुंबईतील दोन हजारांहून अधिक झाडांची पडझड झाल्याच्या घटना समोर आल्या. शहरात ८१५ वृक्ष पडल्याची कबुली पालिका प्रशासनाने दिली आहे. या घटनांनंतर पालिका प्रशासनाच्या कारभाराच्या विरोधात भाजपने आक्रमक भूमिका घेतली होती. विरोधी पक्षाने घेतलेल्या भूमिकेनंतर सत्ताधारी आणि प्रशासनाने खडबडून जागे होत महापालिकेत सोमवार, दि. २४ मे रोजी वृक्ष प्राधिकरणाची बैठक घेऊन बैठकीत वृक्षछाटणीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

मुंबईतील धोकादायक झाडांची छाटणी आणि कापणी करण्यासाठी पालिका प्रशासनातर्फे कंत्राटदार निवडीसाठी निविदा मागवली होती. दि. १८ मार्च, २०२१ रोजी याबाबतचा प्रस्ताव वृक्ष प्राधिकरण समितीसमोर घेण्यात आला होता. मात्र, सत्ताधारी व कंत्राटदारांमधील कथित आर्थिक हितसंबंधांमुळे या प्रस्तावाचे पुढे काही होऊ शकले नाही, अशी चर्चा मुंबईकरांमध्ये व प्रसार माध्यमांमध्ये होती. दरम्यान, मागील आठवड्यात आलेल्या 'तोक्ते' चक्रीवादळामुळे शहरात ८१५ झाडे उन्मळून पडली. पालिकेने जर वेळीच वृक्षछाटणीसाठी कंत्राटदाराची नियुक्ती केली असती, योग्य वेळेत मोठ्या प्रमाणात वृक्षछाटणी झाली असती, तर शहरातील ८१५ झाडांचा जीव वाचला असता हे वास्तव आहे.

बैठक का झाली नाही?

वृक्ष प्राधिकरण कायद्यानुसार समितीची बैठक दर २१ दिवसांनी होणे बंधनकारक आहे, असे असताना २३ मार्च, २०२१पासून ६० दिवसांत वृक्ष प्राधिकरणाची एकही बैठक झाली नाही. वृक्षछाटणीचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव प्रलंबित राहिल्याने मुंबई शहराच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या ८१५ प्राचीन वृक्षांचा वध झाला. याला संपूर्णतः सत्ताधारी आणि प्रशासन जबाबदार असल्याची टीका भाजपच्या वतीने करण्यात आली.

''आता हा प्रस्ताव मंजूर झाल्यामुळे महापालिकेने तोंडावर येऊन ठेपलेल्या पावसाळ्यापूर्वी युद्धपातळीवर वृक्षछाटणी केली पाहिजे,'' असे मत नगरसेवक अभिजीत सामंत यांनी व्यक्त केले.

भाजपचे प्रशासनाला सवाल

दरम्यान, सोमवारी घेण्यात आलेल्या वृक्ष प्राधिकरण समितीच्या बैठकीत भाजप नगरसेवक अभिजीत सामंत यांनी हरकतीच्या मुद्द्याद्वारे काही महत्त्वाच्या बाबी पालिका आयुक्तांच्या निदर्शनास आणल्या. ''२०१८मध्ये महापालिकेने उदवाहनारूढ स्वयंचलित यांत्रिकी करवत यंत्र विकत घेण्यासाठी पाच कोटींची आर्थिक तरतूद केली होती. मात्र, तीन वर्षांनंतरही जर पालिका या कामाबाबत गंभीर नसेल तर पावसाळ्यापूर्वी करण्यात येणारी वृक्षछाटणीची कामे पालिका कधी करणार? तसेच नैसर्गिक आपत्तीमध्ये गृहनिर्माण सोसायट्यांमधील पडलेल्या झाडांचे पुढे काय करायचे यावर प्रशासनाचे धोरण काय?'' असे सवाल भाजपचे नगरसेवक अभिजीत सावंत यांनी विचारले आहेत.

मुंबईतील हरित कचऱ्याचे नियोजन काय?

चक्रीवादळाची तीव्रता आणि प्रभाव कमी झाल्यानंतर महापालिकेने शहरात झालेल्या नुकसानीविषयी आकडेवारी जाहीर केली. त्यानुसार शहरात तब्बल ८१२ झाडे जमीनदोस्त झाली असून, त्यापैकी काही झाडे निवासी, व्यावसायिक इमारतींच्या संरक्षक भिंतींवर पडल्याने जीवितहानीदेखील झाली आहे. विविध ठिकाणी घडलेल्या या अपघातांमुळे मुंबईतील हरित कचऱ्याचे नियोजन काय? हा सवाल पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

चक्रीवादळामुळे पडलेली झाडे उचलण्यात पालिकेकडून मोठी दिरंगाई झालेली आहे. शहरात हरित कचरा निर्मूलनाचा प्रकल्प घाटकोपर येथे आहे. मात्र, तोही मागच्या मार्च महिन्यापासून बंद आहे. हरित कचऱ्याच्या नियोजनाचे कसलेही मॉडेल मुंबई महापालिकेकडे नाही. त्यामुळे अशा दुर्घटना घडल्यानंतर पडलेली झाडे व जमा होणारा हरित कचरा याच्या नियोजनाचा काही पर्याय पालिकेकडे आहे का? हा एक महत्त्वपूर्ण सवाल आहे. हरित कचरा निर्मूलनाचा अत्यंत सुंदर प्रकल्प मुंबई शेजारील ठाणे महापालिकेने काही वर्षांपूर्वी यशस्वीरीत्या अस्तित्वात आणून दाखवला होता.

नैसर्गिक आपत्ती अथवा कुठल्याही कारणामुळे जमा झालेल्या हरित कचऱ्यावर अत्यल्प पैशांमध्ये प्रक्रिया करून त्यामार्फत तयार होणाऱ्या साधनाचा वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित काही कामासाठी वापर केला गेला. ज्यामुळे एकतर हरित कचऱ्याचे नियोजन झाले व त्यातून वैद्यकीय क्षेत्रातील कामांतही मदत झाली. समस्यांवर तोडगा काढण्यासाठी मार्ग अनेक आहेत. मात्र, अशा प्रकल्पांसाठी इच्छाशक्तीची मोठी गरज आहे. भविष्यात मुंबई महापालिका प्रशासन या प्रकल्पाकडे लक्ष देऊन मुंबईकरांची या समस्येतून सुटका करेल, अशी अपेक्षा सर्वसामान्य मुंबईकरांनी व्यक्त केली आहे.

रा. स्व. संघाच्या वतीने 'ऑक्सिजन कॉन्सेन्ट्रेटर' उपलब्ध

दांडेश्वर भाग शाखेचा उपक्रम

मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी): देशातील कोरोना संसर्गाचा प्रभाव पाहता आरोग्य व्यवस्थेवर मोठा तणाव निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत विविध समाजसेवी संस्था सरकारला मदत करण्यासाठी पुढे सरसावत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दांडेश्वर सेवा विभागाच्या वतीने गरजू रुग्णांकरिता पाच लीटर क्षमतेचे 'ऑक्सिजन कॉन्सेन्ट्रेटर' आणि ४७ लीटर क्षमतेच्या 'ऑक्सिजन सिलिंडर'ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. सांताक्रूज (पश्चिम) येथील चंचल स्मृती, दुसरी गावठाण लेन येथे ही सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. यासाठीची संपूर्ण प्रक्रिया 'ऑनलाईन' असणार आहे. अधिक माहितीसाठी 'डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.एमटीडीएनजीओ.ओआरजी.' या संकेतस्थळावर भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

काँग्रेस नेत्याचा राज्य सरकारला घरचा आहेर..!!

ठाकरे सरकारच्या कारभारावर काँग्रेसनेत्याचा निशाणा

मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी): ठाकरे सरकारने महाराष्ट्रात कडक निर्बंध लावताना राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आर्थिक मदत देण्याची घोषणा केली होती. मात्र, सरकारतर्फे जाहीर करण्यात आलेली मदत अद्यापही त्या घटकापर्यंत मिळाली नसल्याचा दावा राज्यातील सत्ताधारी असलेल्या काँग्रेसच्या नेत्याने केला आहे. काँग्रेसनेत्याच्या या टीकेमुळे राज्य सरकारला एकप्रकारे घरचा आहेर मिळाला असल्याचे बोलले जात आहे.

''राज्य सरकारने महाराष्ट्रातील रिक्षाचालकांसाठी जाहीर केलेली मदत मिळावी, यासाठी एका 'ऑनलाईन' प्रणालीची सुरुवात राज्य सरकारकडून करण्यात आली आहे. मी त्याचा पाठपुरावा गेल्या ३६ तासांपासून करत आहे. मात्र, ३६ तास उलटून गेले तरी सरकारी संकेतस्थळाची ही लिंक कामच करत नाही, असे लक्षात आले आहे,'' असे काँग्रेसनेते संजय निरुपम यांनी म्हटले आहे.

सरकारची मदत रिक्षाचालकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्याच्या परिवहन खात्याकडून 'ऑनलाईन' प्रणालीची सुरुवात करण्यात आली. पण, ही साईटच योग्य प्रतिसाद देत नसल्याचे निदर्शनात येत आहे. काँग्रेसनेते माजी खासदार संजय निरुपम यांनी सदर 'साईट' चालत नसल्याचा एक व्हिडिओ अपलोड केला आहे. ३६ तास उलटून गेले तरीही ही 'वेबसाईट' चालत नसल्याचे निरुपम यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे. काँग्रेसनेते निरुपम यांनी केलेल्या टीकेमुळे ठाकरे सरकारला घरचा आहेर मिळाला असल्याचे म्हटले जात आहे.

लहान मुलांकरिता स्वतंत्र 'कोविड सेंटर'ची उभारणी करा

भाजपनेते भालचंद्र शिरसाट यांची मागणी

मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी): ''कोरोनाची मुंबईतील सद्यः स्थिती व येत्या काळात येणारी संभाव्य तिसरी लाट लक्षात घेता मुंबई शहरात लहान मुलांसाठी स्वतंत्र 'कोविड सेंटर' उभारण्यात यावीत,'' अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे स्थायी समिती सदस्य भालचंद्र शिरसाट यांनी मुंबई महापालिका आयुक्तांकडे एका पत्राद्वारे केली.

''कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे राज्यात हाहाकार माजला आहे. लहान मुलांना कोरोनापासून बचाव करणारी कोरोना प्रतिबंधक लस अद्याप आलेली नाही, त्यातच कोरोनाच्या येऊ घातलेल्या तिसऱ्या लाटेत लहान मुलांना व १८ वर्षांपर्यंतच्या मुलांना कोरोनाचा धोका जास्त होण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तविली आहे. त्यामुळे कोरोनाची तिसरी लाट थोपविण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करणे गरजेचे आहे. कोरोनाची संभाव्य तिसरी लाट लक्षात घेता पुणे महापालिकेमार्फत लहान मुलांसाठी 'कोविड सेंटर' उभारण्यात आले आहे. यामध्ये लहान मुलांसह त्यांच्या पालकांना राहण्याची सोय, लहान मुलांसाठी पक्षी, प्राण्यांची चित्रे, खेळणी अशा मनोरंजनाच्या अनेक खास सुविधा देण्यात आल्या आहेत. तरी पुणे महापालिकेच्या धर्तीवर मुंबईतही महापालिका प्रशासनाच्या वतीने लहान मुलांसाठी अशाच प्रकारचे 'कोविड सेंटर' उभारण्यात यावे आणि त्यासाठी आवश्यक बालरोगतज्ज्ञांचीदेखील नेमणूक करण्यात यावी,'' अशी मागणी स्थायी समिती सदस्य भालचंद्र शिरसाट यांनी महापालिका आयुक्तांना एका पत्राद्वारे केली आहे.

शांतियज्ञाचे सल्ले देणाऱ्यांनी आधी वर्षावरच 'हनुमान चालिसा पाठ' करून घ्या

आचार्य तुषार भोसले यांची शिवसेनेवर टीका

मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी): मागील वर्षभरापासून राज्यपाल नियुक्त सदस्यांचा तिढा सुटलेला नाही. आता हा वाद उच्च न्यायालयात पोहोचला असून, यावर शिवसेनेने टीका केली आहे. ''सहा महिन्यांपासून एका फाईलचे राजकारण करत आहेत, आता तर ती फाईलही भुतांनी पळवली. राजभवनात अलीकडे कोणत्या भुताटकीचा वावर वाढला आहे? एकदा शांतियज्ञ करून घ्यावा लागेल,'' असा टोला शिवसेनेने लगावला आहे. 'सामना' या मुखपत्रातून शिवसेनेने ही टीका केली आहे. यावर, ''राजभवनावर शांतियज्ञाचे सल्ले देणाऱ्याने आधी वर्षावरच 'हनुमान चालिसा पाठ' करून घ्यावा आणि मुख्यमंत्र्यांची भीती काढून घ्यावी,'' असे प्रत्युत्तर भाजप आध्यात्मिक आघाडीचे अध्यक्ष आचार्य तुषार भोसले यांनी शिवसेनेला दिले आहे.

शिवसेनेतर्फे करण्यात आलेल्या या टीकेला उत्तर देताना आचार्य तुषार भोसले म्हणाले की, ''साधू-संतांच्या पदस्पर्शाने राजभवन पवित्र आहे आणि राज्यपाल हे कर्मयोगी 'धर्म रक्षक' आहेत. त्यामुळे तिथे कोणत्याही यज्ञांची गरज नाही. मात्र, वर्षा निवासस्थानाला नक्कीच भुताटकीने पछाडले असावे, म्हणूनच तर मुख्यमंत्री घराच्या बाहेर पडत नाहीत आणि तिथे रात्री झोपायलाही घाबरतात. तेव्हा राजभवनावर शांतियज्ञाचे सल्ले देणाऱ्याने आधी वर्षावरच 'हनुमान चालिसा पाठ' करून घ्यावा आणि साधू-संतांना बोलावून मुख्यमंत्र्यांची भीती काढून घ्यावी म्हणजे जनतेचे दुःख समजून घेण्यासाठी त्यांना घराबाहेर पडता येईल आणि जाता-जाता तरी लोककल्याणाचे निर्णय घेता येतील.''

''लॉकडाऊन' १ जूननंतर शिथिल होण्याची शक्यता; मात्र लोकल आणखी १५ दिवस नाही'

मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी): 'रेड झोन'मधील जिल्हे वगळता राज्यातील 'लॉकडाऊन' १ जूननंतर शिथिल होण्याची शक्यता आहे. राज्याचे मदत व पुनर्वसनमंत्री विजय वडेट्टीवार यांनी याबाबतचे संकेत दिले. मात्र, त्याबरोबरच ''मुंबईतील लोकलसेवा पुढील १५ दिवस तरी सर्व प्रवाशांसाठी खुली करता येणार नाही,'' असेही वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले. वडेट्टीवार मुंबईत सोमवारी माध्यमांशी बोलत होते.

'''निसर्ग' चक्रीवादळाप्रमाणे 'तोक्ते' चक्रीवादळानेही मोठे नुकसान केले आहे. वीज खूप ठिकाणी गेली होती. २९ हजार घरांची पडझड झाली आहे. बागायती पंचनामे सुरू असून, ते चार-पाच दिवसांत पूर्ण होतील. तसेच समाधान देणारी मदत केली जाईल,'' असे मंत्री विजय वडेट्टीवार यांनी सांगितले. ''समुद्रकिनारी भागात नुकसान पुन्हा होऊ नये, यासाठी कायमस्वरूपी काम करावे लागणार आहे. त्यासाठी वेगळे पुनर्वसन धोरण केले जाईल व त्याचा मसुदा कॅबिनेट बैठकीत चर्चेला ठेवण्यात येईल,'' असेही वडेट्टीवार यांनी सांगितले.

तसेच राज्यातील 'लॉकडाऊन'विषयी बोलताना वडेट्टीवारम्हणालेकी, '''लॉकडाऊन' शिथिल करण्याबाबतचा निर्णय पुढील पाच दिवसांत सरकार घेईल. 'लॉकडाऊन' शिथिल करावे का? जीवनमरणाचा प्रश्न आहे, त्यामुळे 'लॉकडाऊन' शिथिल करावे, ही मागणी होत आहे. पुढील पाच दिवस परिस्थिती बघू आणि त्यानंतर निर्णय घेऊ. १४ जिल्हे 'रेड झोन'मध्ये आहेत. तिथे सगळे नियम शिथिल करणे शक्य नाही. 'हॉटस्पॉट' तिथे कडक नियम राहिले पाहिजे ही भूमिका आहे. तसेच रुग्णसंख्या कमी तिथे 'लॉकडाऊन'चे नियम शिथिल करावे, असे माझे मत आहे.''

मार्कसन्स फार्मा लिमिटेड
CIN: L24110MH1992PLC066364
नोंदणीकृत कार्यालय: ११वा मजला, ग्रॅण्डीयर, वीरा देसाई विस्तारित मार्ग, ओशिवरा, अंधेरी, (पश्चिम), मुंबई-४०० ०५३. **दूरध्वनी:** ०२२ ४००१ २०००; **फॅक्स क्र.:** ०२२ ४००१ २०११
ईमेल: companysecretary@marksanspharma.com

भारतीय सिक्युरिटीज व एक्सचेंज बोर्ड (सूचीकरण आबंधने आणि प्रकटन आवश्यकता) नियमने, २०१५ च्या नियमन ४७ च्या अनुरोधाने, ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या वर्षाअखेरचा लेखापरीक्षित वार्षिक वित्तीय निकाल (स्वतंत्र आणि एकत्रित दोन्ही), इतर गोष्टींबरोबर, विचारात घेण्यासाठी आणि त्यांना मंजुरी देण्यासाठी कंपनीच्या संचालकीय मंडळाची बैठक ही **सोमवार, ३१ मे, २०२१** रोजी घेण्यात येईल. ही सूचना कंपनीच्या वेबसाईट www.marksanspharma.com आणि स्टॉकएक्स्चेंजच्या वेबसाईट www.bseindia.com आणि www.nseindia.com येथे उपलब्ध आहे.

कंपनीच्या आतील लोकांसाठी सम भागांच्या व्यवहाराकरिता ट्रेडिंग विंडो बंद होण्याचा कालावधी १ एप्रिल, २०२१ पासून ३१ मे, २०२१ रोजी निकाल झाल्यानंतर ४८ तास संपेपर्यंत बंद राहील.

मार्क्सन्स फार्मा लिमिटेडसाठी
सही/-
हर्षवर्धन पाणीग्रही
कंपनी सचिव
मुंबई
२४ मे, २०२१

विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी न खेळता परीक्षांबाबत भूमिका स्पष्ट करा

भाजप मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांची मागणी

मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी): ''महाविकास आघाडी सरकारच्या निष्काळजीपणामुळे दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे. कोरोनाच्या तणावासोबतच बोर्डाच्या परीक्षा होणार की नाही, या तणावाला लाखो विद्यार्थी, पालक सामोरे जात आहेत, त्यामुळे महाविकास आघाडी सरकारने लवकरात लवकर दहावी, बारावीच्या परीक्षांबाबत योग्य निर्णय घ्यावा,'' अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी सोमवारी केली. भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

उपाध्ये म्हणाले की, ''कोरोना साथीमुळे राज्यात गंभीर परिस्थिती उद्भवली आहे, हे जरी खरे असले तरी कोणत्याही विद्यार्थ्यांच्या भवितव्याचे दीर्घकालीन नुकसान होणार नाही याची जबाबदारी सरकारची आहे. उच्च न्यायालयाच्या फटकाऱ्यानंतरही राज्य सरकारने दहावी, बारावी परीक्षांच्या प्रश्नावर तोडगा काढला नाही. मुख्यमंत्र्यांना या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठीही वेळ नाही. मुळात ज्या मुख्यमंत्र्यांनी अवघ्या तीन तासांत कोकणातला वादळदौरा आटोपला, त्या मुख्यमंत्र्यांना या परीक्षांचे महत्त्व आहे की नाही, हाही प्रश्न आहे.''

उपाध्ये म्हणाले की, ''तीन नापासांनी आपले मार्क एकत्र करून पहिला नंबर आलेल्याला हरवले आणि राज्यात सरकार स्थापन केले. पण, अशी लबाडी विद्यार्थ्यांना करता येणार नाही. तेव्हा राज्य सरकारने विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करू नये. जर राज्य सरकार परीक्षा घेणार नसेल तर पुढील वर्गातील प्रवेश प्रक्रिया कशी असणार आहे, याबाबतची स्पष्टता अजूनही सरकारने केलेली नाही. परीक्षा न घेण्याचा पर्याय सरकार निवडणार असेल, ज्या-ज्या ठिकाणी बारावीचे गुण ग्राह्य धरले जातात त्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियांचे काय? सरकारच्या या वेळखाऊ, धोरणलकव्यामुळे राज्यातल्या लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे याचे भान या सरकारने ठेवावे.''

उपाध्ये पुढे म्हणाले की, ''राज्यात कोरोना रुग्णसंख्या वाढल्यास राज्य सरकारची बदनामी होईल, त्यामुळे चाचण्यांचे प्रमाण कमी करा, असा सल्ला एका पत्रकाराने दिल्याने चाचण्या कमी करण्यात आल्याचे वक्तव्य राज्याचे अल्पसंख्याक मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते नवाब मलिक यांनी एका दूरचित्रवाहिनीच्या मुलाखतीत केले आहे. पत्रकारांचे ऐकून सरकारने राज्यात चाचण्यांचे प्रमाण कमी केले का, याचा खुलासा सरकारने करावा. या सरकारने घटनेची शपथ घेतली आहे. त्यामुळे लोकोपयोगी निर्णय घेणे हे सरकारचे कर्तव्य आहे. मात्र, आपले अपयश झाकण्यासाठी चाचण्यांचे प्रमाण कमी करून रुग्णसंख्या कमी दाखवली आणि आता त्याचे खापर पत्रकारावर फोडले जात आहे, हे निंदनीय आहे.'' असेही उपाध्ये यांनी यावेळी म्हटले.

मराठा आंदोलकाचा एल्गार पोलिसांनी आंदोलनापूर्वी रोखला

मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी): सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण रद्द करण्याचा निर्णय दिल्यानंतर राज्यातील सकल मराठा समाज आक्रमक झाला आहे. याच पार्श्वभुमीवर दि.२४ मे रोजी काही मराठा आंदोलकानी मुंबईत मंत्रालयाच्या गेट बाहेर आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. मात्र तत्पुर्वी संबंधित मराठा आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षण रद्द झाल्यानंतर राज्यातील मराठा समाजामध्ये तीव्र असंतोषाची लाट आहे. आरक्षणाबाबत केंद्र सरकार बरोबरच राज्य सरकारच्या भूमिकेवर मराठा समाज तसेच मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकांकडून शंका उपस्थित केल्या जात आहेत. दरम्यान, मराठा आरक्षण रद्द झाल्याच्या निषेधार्थ सोमवार, दि. २४ मे रोजी मुंबईत मंत्रालयासमोर आंदोलन करून हे आंदोलक आपला विरोध प्रदर्शित करणार होते. मात्र तत्पूर्वी पोलिसांनी संबंधित सर्व आंदोलकांना ताब्यात घेऊन त्यांना काही वेळाने सोडून देण्यात आले.

'कोरोना' रुग्णसंख्येत पुन्हा घट

मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी): मुंबईत कोरोना रुग्णसंख्येतील चढ-उतार कायम आहे. रविवारी शहरात १,४३१ नवे कोरोनारुग्ण आढळले होते, मात्र सोमवारी रुग्णसंख्येत पुन्हा एकदा घट झाल्याचे पाहायला मिळाले. सोमवारी रुग्णसंख्येत घट होत शहरात एकूण १,०५७ रुग्ण आढळले. त्यामुळे मुंबईतील कोरोनाबाधितांची एकूण संख्या ६,९८,८६७ झाली. दिवसभरात १,३१२ रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला असून दिवसभरात ४८ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. शहरातील मृतांची एकूण संख्या १४,६७१ झाली. तर मुंबईत सध्या २८,०८६ सक्रिय रुग्ण असून ते विविध रुग्णालयात उपचार घेत आहेत.

जाहीर नोटीस

तुकडी जिल्हा ठाणे, पोटतुकडी तालुका कुर्ला, मौजे मुलुंड येथील **बृहन्मुंबई मुन्यसिपल कारपोरेशन महानगरपालीकेच्या** हद्दीतील तसेच मे. सह दुय्यम निबंधक सो. मुलुंड यांच्या कार्यक्षेत्रातील खालील परिशिष्टात खुलासेवार वर्णन केलेली जमिनीची मिळकत :

सिटी. एस. नं.	११२३ अ/१/४	८७८.० चौ. मी.
सर्व्हे नं	१२९/२	१४.७२ चौ. मी.

अशी जमिनीची मिळकत **श्रीमती. मेघा गोपाळ वैती उर्फ मेघा शैलेश पाटील व इतर ५** यांच्या मालकीची व कब्जेवहिवाटीची असून , सरकार दप्तरी ७/१२ सदरी नावे नोंद आहे. हि मिळकत आमचे अशिल **मेसर्स डब्ल्यू.एन.के कन्स्ट्रक्शन्स तर्फे प्रोपरायटर तर्फे नसिम नियाज खान राहणार कल्याण** यांना विकसित करण्यास देणार आहोत.

सदरहु मिळकत आमचे अशिलांनी **श्रीमती. मेघा गोपाळ वैती उर्फ मेघा शैलेश पाटील व इतर ५** यांच्या कडून चोख, निर्विवाद व सर्व ऋणबोजेमुक्त अशी विकसीत हक्काने घेण्यासाठी **श्रीमती. मेघा गोपाळ वैती उर्फ मेघा शैलेश पाटील व इतर ५** यांच्या कडून विकसीत करार, कुलमुखत्यारपत्र, व तत्सम अनुषंगीक लेखटेक लिहून व नोंदवुन घेणार आहेत. त्यामुळे सदरहू मिळकतीचे स्वामित्व तपासण्यासाठी तसेच सदरहू मिळकत सर्वऋणबोजेमुक्त व बोजेविरहीत असल्या संबंधीची खातरजमा करण्यासाठी जाहीर नोटीस देण्याची विंनती माझे अशिलांनी मला केली आहे व त्यांनी सांगितल्यावरून सदरहू मिळकतीसंबंधी खुलासेवार जाहीर नोटीस देत आहे. तरी सदरहू मिळकतीवर वा तिच्या भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्तखत, तारण, कुळवहिवाट, भाडेकरूपणाचे हक्क, विश्वस्त,वारसा, देखभाल, लीज, वहिवाट, पोटगी, साठेकरार, बयाणा वा तत्सम हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विशद करुन खालील सही करणार यांच्या पत्यावर पुराव्यासह लेखी कळवावे. वरील मुदतीत कुणाकडुन काही लेखी हरकत, तक्रार वा दावा न आल्यास मिळकत निर्वेध व बोजेविरहित आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागून आलेल्या तक्रारी, दावा व हरकती या रद्दबातल आहेत असे समजण्यात येतील.

दिनांक : २४/५/२०२१
सही/-
पत्ता : गाळा नं.एफ/२, मंगेशी सिटी फेज-१, कोळीवली, आधारवाडी जेल रोड, कल्याण (प) मो-७९७७८७३३८७
विद्या सुनिल फडताळे
(विकासकातर्फे वकील)

भगेरिया इंडस्ट्रीज लि.
(CIN: L40300MH1989PLC052574)
नोंद. कार्यालय: कार्यालय क्र. १००२, १० वा मजला, टोपीवाला सेंटर, ऑफ एस. व्ही. रोड, गोरेगाव (प), मुंबई ४०० ०६२. **दूरध्वनी:** +९१-२२-४०४३६६६६
Email: info@bhageriagroup.com; **Website:** www.bhageriagroup.com

सूचना

कंपनीच्या समभागांचे गुंतवणूकदार प्रशिक्षण आणि संरक्षण निधी (आयईपीएफ)मध्ये हस्तांतरण

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १२४(६) ('कायदा') आणि गुंतवणूकदार प्रशिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (लेखांकन, लेखापरिक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियमन, २०१६, तात्कालिन वापराकरिता कोणत्याही वैधानिक सुधारणा आणि दुरुस्तांसह ('नियमन') च्या तरतुदींच्या अनुरोधाने, याद्वारे सूचना देण्यात येते की, **वित्तीय वर्ष २०१३-१४ दरम्यान घोषित अंतिम लाभांश,** जो गेल्या सात वर्षांच्या कालवधीकरिता दावा केला गेलेला नाही, **दि. २५ ऑगस्ट, २०२१** रोजी आयईपीएफ मध्ये हस्तांतरण करण्यात येईल. सुसंगत भाग ज्यावरील लाभांश सात सलग वर्षांकरिता दावा केलेला नाही ते देखील नियमांमध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार हस्तांतरित करण्यात येतील.

नियमांचे अनुपालन करताना, कंपनीने ज्यांचे भाग उपरोल्लेखित नियमांनुसार आयईपीएफला हस्तांतरित होणार आहेत अशा संबंधित भागधारकांना वैयक्तिकरित्या संपर्क साधला आहे, अशा भागधारकांचा संपूर्ण तपशील कंपनीची वेबसाईट **https://www.bhageriagroup.com/iepf/** येथे उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

या संदर्भात, कृपया खालील बाबींची नोंद घ्यावी:

अ) जर तुम्ही भाग भौतिक स्वरुपात धारण करत असल्यासः दुय्यम भाग प्रमाणपत्र(त्रे) पारित करण्यात येतील आणि आयईपीएफकडे हस्तांतरित करण्यात येतील. तुमच्या नावा(वां)वर नोंदणीकृत आणि तुम्ही धारण केलेली मूळ भाग प्रमाणपत्र(त्रे) आपोआपच रद्द होतील.

ब) जर तुम्ही इलेक्ट्रॉनिक स्वरुपात भाग धारण करीत असल्यासः तुमच्या डीमॅट खात्यामधून आयईपीएफला हस्तांतरित करण्यास पात्र असलेले भाग वळते करण्यात येतील.

दि. २५ ऑगस्ट, २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी वैध दावा प्राप्त न झाल्यास, कंपनी कोणतीही पुढील सूचना न देता पात्र लाभांश आणि सम भाग आयईपीएफ प्राधिकरणाच्या नावे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरु करेल. कृपया नोंद घ्यावी की दावा न सांगितलेल्या लाभांश रक्कम आणि आयईपीएफला हस्तांतरित केलेल्या भागांसंदर्भात सदर नियमांच्या अनुशंगाने कंपनीच्या विरुद्ध कोणताही दावा नाही. नोंद घ्यावी की, संबंधित भागधारक विहीत अर्ज आयईपीएफ-५ मध्ये ऑनलाईन अर्ज करुन आणि कंपनीच्या नोडल अधिकाऱ्यास, आयईपीएफ-५ मध्ये नणलेल्या आवश्यक कागदपत्रांच्या भौतिक प्रती पाठवून आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडून भाग आणि लाभांशांवर दावा करु शकतात.

जर भागधारकांना संबंधित प्रकरण आणि नियमांबाबत कोणतीही शंका असल्यास, त्यांनी कंपनीच्या निबंधक आणि भाग हस्तांतरण एजंट यांना **लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लि.** सी-१०१, २४७ पार्क, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी पश्चिम, मुंबई ४०००८३, **दूरध्वनी:** ०२२-४९१८६२७०. **ईमेल आयडी: rnt.helpdesk@linkintime.co.in** किंवा **iepf.shares@linkintime.co.in** येथे संपर्क साधावा.

भगेरिया इंडस्ट्रीज लिमिटेडकरिता
सही/-
कृणाल वाला
कंपनी सचिव
ठिकाणः मुंबई
दिनांक : २४ मे, २०२१